नियमित दिवाणी मुकदमा क्र. १६५/२०१२

**नि. ९५ खालील आदेश**

१. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. सदरचा अर्ज वादीने मुख्याधिकारी, सावंतवाडी नगर परिषद यांना इमला क्र. बी—२१८अ या इमल्याचे कर निर्धारण नोंदीला वादीचे नांव लागल्याबाबत व कमी झाल्याबाबतचे ठराव व आदेशाची कागदपत्र सादर करण्यासाठी व आवश्यकता भासल्यास त्यांची साक्ष नोंदविण्यासाठी साक्षीसमन्स काढण्याची मागणी केली आहे.

२. सदरील दावा हा पाच वर्षाहून अधिक जुना असून दाव्यामध्ये वादी प्रतिवादीचा पुरावा संपल्यानंतर त्यांचा युक्तीवादसुध्दा ऐकण्यात आला व दावा वादीच्या प्रतियुक्तीवादासाठी असताना वादीने नि.८२ कडे अर्ज देवून त्यांचा पुरावा बंदचा आदेश रद्द होवून त्यांना बक्षिसपत्राबाबत पुरावा देण्याची संधी मिळावी अशी मागणी केली होती. तो अर्ज मंजूर करण्यात आलेला आहे. त्यानंतर वादीने प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. दाव्यामध्ये वादीला पुन्हा पुरावा देण्याची संधी देण्यात आलेली असून त्याकरीता म्हणजेच दावा मिळकतीत वादीचा हक्क व अधिकार आहे की नाही याकरीता सदरील साक्षीदाराची साक्ष वादीला नोंदवायची असून त्याचबाबत साक्षीदारामार्फत कागदपत्र दाखल करण्यासाठी त्यांना साक्षीसमन्स काढण्याकरीता मागणी केलेली आहे. दाव्याचे स्वरूप पहाता वादीला त्याची बाजू शाबित करण्यासाठी वादीने अर्जात मागणी केल्याप्रमाणे साक्षीसमन्स काढणे आवश्यक व न्यायोचित वाटते. सबब वरील बाबींचा विचार करता अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजुर केला.

२. वादीने मागणी केल्याप्रमाणे मुख्याधिकारी, सावंतवाडी नगर परिषद यांना अर्जात मागणी केल्याप्रमाणे कागदपत्र दाखल करण्यासाठी व साक्ष देण्याकरीता साक्षीसमन्स काढण्यात यावे.

३. वादीने साक्षीदाराचा साक्षीभत्ता देणेचा आहे.

**सही/—**
(एम्. एस्. बुधवंत)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), सावंतवाडी.

दिनांक :— १५/११/२०१८.